# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट ३०५/२०२२ दिनांक : ०६/१०/२०२२

## मिरा-भाईंदर शहरातील आरोग्यप्रेमी नागरिकांसाठी पहिल्या वॉकिंग प्लाझ्राचे उद्घाटन.

मिरा-भाईंदर शहरातील राधास्वामी सत्संग परिसर या भागात दररोज सकाळी नागरिक मोठया प्रमाणात वॉकींग करण्यासाठी येत असतात. राधास्वामी सत्संग परिसरातील सुभाषचंद्र बोस मैदानाजवळील सार्वजनिक शौचालय ते शहा आगार पर्यंतच्या सत्संग बाजूकडील रस्ता या ठिकाणी वॉकींग प्लाझ्रा बनवून त्याची अंमलबजावणी व्हावी याकरिता स्थानिक नागरिक, नगरसेवक मागणी करित होते. त्याअनुषंगाने आरोग्यप्रेमी नागरिकांच्या भावना लक्षात घेवून मिरा-भाईंदर महानगरपालिका व शहर वाहतूक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राधास्वामी सत्संग मैदानाच्या बाहेरील बाजूने असणाऱ्या रोडवर दिनांक ०५/१०/२०२२ रोजी शहरातील पहिल्या वॉकींग प्लाझ्राचे उद्घाटन करण्यात आले. सदर ठिकाणी सकाळी ६:०० ते ८:०० वाजेपावेतो नागरिकांना चालण्यासाठी वॉकींग प्लाझ्रा वापरता येणार आहे. मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या दुसऱ्या वर्धापन दिनानिमित्त दिनांक १/१०/२०२२ ते ७/१०/२०२२ पावेतो पोलीसांकडून विशेष सप्ताह राबविण्यात येत असून सदर मोहिमेअंतर्गत उपरोक्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.





उपरोक्त वॉकींग प्लाझाच्या उद्घाटन कार्यक्रमप्रसंगी श्री. दिलीप ढोले, आयुक्त-मनपा, मिरा-भाईंदर, श्री विजयकांत सागर, पोलीस उपआयुक्त (मुख्यालय), श्री विनायक नरळे, सहा पोलीस आयुक्त (मुख्यालय), श्री शांतीलाल जाधव, सहा. पोलीस आयुक्त, पोलीस निरीक्षक श्री मुकूटलाल पाटील, रमेश भामे इतर पोलीस अधिकारी/अंमलदार व आरोग्यप्रेमी नागरिक उपस्थित होते.

----ooo----